Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-2019 Special Issue – 90 (B)

## महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi),
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] India

St. MIRA'S COLLEGE FOR GIRLS * POONA-411001 *

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 700/-

'RESEARCH JOURNEY' *International E- Research Journal* | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013) | January-2019
Special Issue 90 (B): महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता
UGC Approved Journal

## Editorial Board

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV'S Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
**Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)**
**Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)**
**Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)**
**Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)**

**Co-Editors -**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik.
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon.
- **Prof. Vinay Madgaonkar** - Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik** - Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh** - Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon
- **Dr. Samjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari
- **Prof. Vijay Shirsath** - Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon [M.S.]
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul [M.S.]
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik [M.S.]
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon [M.S.]
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar [M.S.]
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda [M.S.]

**Advisory Board -**
- **Dr. Marianna kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS., Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Act. Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**
- **Dr. J. S. More** – BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**– BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali ,** HOD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** – Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar** – M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

**Published by –**
**© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258



ST. MIRA'S ... POONA-411001
Principal Incharge
St. Mira's College for Girls, Pune.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 90 (B): महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

# अनुक्रमणिका



| अ.क्र. | शीर्षक | लेखक /लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | विद्यार्थ्यांना परीक्षेमुळे येणाऱ्या ताण – तणावांचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी योगा एक प्रभावी उपाय | प्रा.जय सोने | 06 |
| 2 | महाराष्ट्रातील विभागनिहाय सिंचन निर्मिती व अनुशेष | प्रा.प्रविण कुलकर्णी | 08 |
| 3 | महाराष्ट्रातील लोकसंख्या वैशिष्ट्यांचे बदलते स्वरूप – एक अभ्यास | प्रा.मेघा पाटोळे | 11 |
| 4 | महाराष्ट्राची अर्थव्यवस्था – एक मंथन | प्रा. हरिहर मोहोकार | 15 |
| 5 | महाराष्ट्रातील दुग्ध सहकारी चळवळ – एक आर्थिक दृष्टीकोन | ज्योती महाजन | 19 |
| 6 | महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल आणि सामाजिक – आर्थिक विकास | डॉ.क्रांती बोरावके | 23 |
| 7 | महाराष्ट्रातील सहकार चळवळ | प्रा.विजय तोंडारे | 29 |
| 8 | महाराष्ट्रातील सिंचन योजनांवरील खर्च प्रवृत्तीचे विश्लेषण | डॉ.प्रशांत देशमुख | 32 |
| 9 | महाराष्ट्राच्या सामाजिक विकासात फुले दाम्पत्याचे योगदान | डॉ.उद्धव कांबळे | 37 |
| 10 | महाराष्ट्राच्या विविध प्रदेशातील जलसिंचनाचा अनुशेष | डॉ.विजय नागरे | 41 |
| 11 | महाराष्ट्राच्या विकासात लोकनेते शरद पवारांचे योगदान : एक दृष्टीक्षेप | डॉ.प्रभाकर जगताप | 49 |
| 12 | महाराष्ट्राचा प्रादेशिक असमतोल कारणे आणि परिणाम | प्रा.प्रदीप केंद्रे | 53 |
| 13 | महाराष्ट्रातील कामगार चळवळ : ऐतिहासिक, सामाजिक ,राजकीय एक मागोवा | डॉ.रामदास निहाळ | 58 |
| 14 | मराठवाड्याचे मागासलेपण आणि धोरणांचा दुष्काळ | डॉ.श्रीकांत देशमुख | 61 |
| 15 | महाराष्ट्रातील राजकीय संस्कृती | प्रा.विशाल कुंभार | 64 |
| 16 | महाराष्ट्रात पंचायतराज व्यवस्थेतील महिला नेतृत्व : वास्तव आणि उपाय | डॉ.नंदकिशोर उगले व डॉ.क्रांती बोरावके व सहदेव रोडे | 67 |
| 17 | भारतीय लोकशाही : तत्त्व आणि व्यवहार | डॉ.पंडित नलावडे व डॉ.नंदकिशोर उगले | 72 |
| 18 | महाराष्ट्रातील सहकार चळवळ : सहकारी साखर कारखाने -एक अवलोकन | डॉ.बाबासहेब देशमुख | 76 |
| 19 | महाराष्ट्रातील झोपडपट्टीवासीयांचे समाजजीवन आणि राजकारण | डॉ.बेग रेहानाआरा ईस्माइल | 79 |
| 20 | महाराष्ट्रातील सहकारी चळवळ – आव्हाने व उपाय | डॉ.श्रीमती मीना पाटील | 84 |
| 21 | महाराष्ट्रातील आर्थिक विषमता आणि उपायांबाबत संक्षिप्त आढावा (२०१६ -१७) | डॉ.एम. जी. थोपटे | 88 |
| 22 | मराठवाड्यांचे आर्थिक मागासलेपण – एक आढावा | डॉ.बी.पी.गाडेकर | 93 |
| 23 | महाराष्ट्रातील प्रादेशिक भागातील ग्रामीण दारिद्र्याच्या विषमतेचा अभ्यास | प्रा.भगवान देशमुख | 100 |
| 24 | महाराष्ट्रातील कृषी भूमीउपयोजन : एक चिकित्सक अभ्यास | डॉ.सदाशिव मेंगाळ | 104 |
| 25 | महाराष्ट्रातील ग्रामीण विकासात स्थानिक नेतृत्वाची भूमिका | डॉ.नंदकिशोर उगले, डॉ.कुमुदिनी जोगी | 109 |





ST. MIRA'S COLLEGE FOR GIRLS POONA-411001
Jayah
Principal Incharge
St. Mira's College for Girls, Pune.

| | | |
|---|---|---|
| 26 | भारतातील मुस्लीम समाजातील दारिद्र्याची स्थिती **डॉ. वैशाली पाटील, शाईन शेख** | 112 |
| 27 | १९९१ नंतर औद्योगिक विकासातील प्रादेशिक असमतोल **डॉ. डी. एम. चव्हाण** | 115 |
| 28 | महाराष्ट्रातील सहकार चळवळ **प्रा. सत्यम सानप** | 119 |
| 29 | महाराष्ट्राच्या मानव विकासातील प्रादेशिक असमतोल **प्रा. अमोल पगार** | 122 |
| 30 | महाराष्ट्रातील ग्रामीण विकासात कृषी पर्यटनाची भूमिका **डॉ. क्रांती बोरावके** | 125 |
| 31 | महाराष्ट्रातील सहकार चळवळ **डॉ. अशोक ससाणे** | 130 |
| 32 | वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्या योजनांचा अभ्यास **डॉ. अनंत राठोड** | 133 |
| 33 | महाराष्ट्रातील समतेसाठी दलित पँथरने केलेला संघर्ष **प्रा. जळबा नरवाडे** | 139 |
| 34 | मध्ययुगीन महाराष्ट्रातील ग्रामरचना : विशेष संदर्भ 'बलुतेदार' **श्री किरण पवार** | 142 |
| 35 | शिवकालीन महाराष्ट्रातील ग्रामजीवन **डॉ. ओमशिवा लिगाडे** | 145 |
| 36 | मराठवाडा वैधानिक विकास महामंडळ – एक चिकित्सक अभ्यास **प्रा. प्रेमचंद गायकवाड** | 148 |
| 37 | रं.धों.कर्वेंची शिक्षणासंदर्भात भूमिका – एक चिकित्सक अभ्यास **डॉ. सुभाष बेंजलवार** | 153 |
| 38 | महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समता संघर्ष **प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे, डॉ. महादेव गव्हाणे** | 156 |
| 39 | सारंगखेडा यात्रा ऐतिहासिक वारसा -एक अभ्यास **गोरख वाघ** | 160 |
| 40 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची महाराष्ट्रातील शैक्षणिक चळवळ **किशोर सूर्यवाड** | 163 |
| 41 | महाराष्ट्राच्या जडणघडणीत संतांचे योगदान **डॉ. किसान पालके** | 166 |
| 42 | महाराष्ट्रातील शैक्षणिक चळवळ : एक अभ्यास **प्रा. सहदेव रोडे** | 168 |
| 43 | १८१८ चे सत्तांतर केवळ राजकीय नसून आर्थिक बदलांची सुरुवात : विशेषतः शेतकऱ्यांवरील परिणाम **गणेश भामे** | 173 |
| 44 | ब्राह्मणेतर स्त्री सुधारणा चळवळीत राजर्षी शाहू महाराजांचे योगदान -एक अभ्यास **प्रा. सहदेव रोडे, डॉ. किसान पालके** | 177 |
| 45 | विदर्भाचे प्रादेशिक मागासलेपण आणि मानवी हक्काचा प्रश्न **डॉ. नंदकिशोर उगले** | 181 |
| 46 | महाराष्ट्रातील उपप्रदेशवाद **डॉ. पंडित नलावडे** | 185 |
| 47 | मराठा समाज : सामाजिक, राजकीय विश्लेषण **डॉ. आर. बी. वनारसे** | 189 |
| 48 | बुलढाणा जिल्ह्यातील शहरीकरणाचा विकासक्रम : भौगोलिक अध्ययन **प्रा. अमोल भुयार, डॉ. विजय खराते** | 196 |
| 49 | महाराष्ट्रातील इमारत व इतर बांधकाम कामगार आणि कामगार चळवळीची गरज : एक अभ्यास **अनिल झेंडे, डॉ.व्ही.ए.पाटील** | 200 |
| 50 | महाराष्ट्रातील प्लास्टिक बंदी व पर्यावरणाचा असमतोल **डॉ. विजय गोरडे, प्रा. रवी रणदिवे, प्रा. पराग मेश्राम** | 206 |
| 51 | महाराष्ट्रातील आर्थिक धोरणानंतरच्या कृषी अर्थसहाय्याच्या स्वरूपाचे विश्लेषण **डॉ. वासुदेव उईके** | 211 |
| 52 | महाराष्ट्रातील ख्रिस्ती मिशनरी चळवळीत स्त्रियांची भूमिका **विश्वास वळवी** | 215 |
| 53 | भूमी उपयोजन कार्यक्षमतेचा भौगोलिक अभ्यास – नंदुरबार जिल्हा **राजेंद्र पवार, विजय खराते** | 220 |


St. MIRA'S COLLEGE FOR GIRLS POONA-411001



Jayak
Principal Incharge
St. Mira's College for Girls, Pune.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 90 (B): महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमता
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

# महाराष्ट्रातील घरकामगार : कायदा व संघटना

**Dr. (Mrs.) Manisha Viraj Pimpalkhare**
Asst. Prof. Dept of Economics, St. Mira's College for Girls, Pune
manishapimpalkhare@gmail.com
M- 9890625358

## ABSTRACT

असंघटित रोजगारातील एक प्रमुख क्षेत्र म्हणजे घरकाम होय. अलीकडील काळात या रोजगार क्षेत्रात वेगाने वाढ झालेली दिसून येते.आंतरराष्ट्रीय श्रम संघटना(ILO) च्या आकडेवारीनुसार जगभरातील घरकामगारांची संख्या ६७ दशलक्ष एवढी आहे.(ILO 2016) जागतिक व विशेषात्वाने दक्षिण आशियाई प्रदेशांमध्ये घरकामगारांसाठीच्या कायदेशीर तरतुदींचा अभाव दिसून येतो.Decent work for Domestic workers `m ILO च्या मोहिमेअंतर्गत आंतरराष्ट्रीय पातळीवर C189(2011) व R204(2015) यासारखी मानांकने स्वीकारण्यात आलेली आहेत.भारतात यासंदर्भात झालेल्या घडामोडी व महाराष्ट्रातील संस्थात्मक पातळीवरील प्रयत्न यांचा आढावा घेण्याचा प्रयत्न या लेखाद्वारे करण्यात आलेला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्वीकृत शिफारशी व प्रत्यक्ष तरतुदी यातील तफावतींचा अभ्यास करणे व त्यासंबंधी उपाययोजनांचा विचार करणे तसेच या शिफारशी लागू करण्याच्या प्रक्रियेतील महत्वाच्या घटकांचा परामर्ष घेणे हा या लेखाचा हेतू आहे.तसेच घरकामगार संघटनांचे महाराष्ट्रातील स्थान व महत्व यांचाही विचार या लेखात केला आहे.

----------------------------------

अलीकडील काळात घरकाम या क्षेत्रातील अभ्यासाकडे कायदेतज्ञ संशोधक तसेच धोरणकर्ते यांचे विशेष भर असल्याचे दिसून येते याचे प्रमुख कारण म्हणजे घरकामगारांसाठीच्या कायद्यांचा अभाव व सर्वसाधारण कामगार कायद्यांतून घरकामागारांना वगळण्याचे लक्षणीय प्रमाण हे होय.मोठया प्रमाणात रोजगारसंधी निर्माण करणाऱ्या या क्षेत्रासाठी कायदेशीर व संस्थात्मक धोरणनिश्चिती करण्याची मागणी जोर धरत आहे तसेच अशा तरतुदी ज्या देशांमध्ये उपलब्ध आहेत तेथील घरकामगारांच्या कल्याणावर झालेल्या परिणामांचा अभ्यास हा देखील संशोधनाचा विषय ठरलेला आहे.

या लेखात घरकामगारांच्यासाठीच्या कायदेशीर व संस्थात्मक तरतुदी , व त्यांची प्रभावी अंमलबजावणी याचा अभ्यास केलेला आहे.विशेषत्वाने खङ्ज च्या शिफारशी आणि त्यांच्या तुलनेत भारतातील व महाराष्ट्रातील संस्थात्मक तरतुदींच्या मर्यादा यांचे विवेचन शासकीय अहवाल, खङ्ज चे संशोधन अहवाल व आकडेवारी यांच्या आधारे केलेले आहे.

लेखाची मांडणी पुढीलप्रमाणे - विभाग ख मध्ये घरकाम क्षेत्राची विशेष वैशिष्टये व वैशिष्टयांमुळेच कायदेशीर तरतुदी करण्यात येणाऱ्या अडचणी यांचा विचार केला आहे विभागा खख मधे जागतिक पातळीवरील मानांकने व काही देशातील आणि भारतातील संख्यात्मक तरतुदी यांचे विवेचन केले आहे.विभाग खखख मध्ये महाराष्ट्रातील घरकामगार कल्याण मंडळ यांची स्थापना , कार्ये व मर्यादा यांचे विवेचन केले आहे विभाग खत मधे निष्कर्ष मांडले आहेत.

विभाग I : घरकाम क्षेत्राची विशेष वैशिष्टये

१.घरकाम क्षेत्रासाठी कायदे करताना येणारी प्रमुख अडचण म्हणजे घरकाम व घरकामगार यांची व्याख्या करण्यामधे असणारी संदिग्धता. घरकाम म्हणजे काय, त्यात कोणत्या कामांचा समावेश होतो, मालक व घरकामगार यांची व्याख्या यासंबंधी प्रादेशिक तसेच सांस्कृतिक पातळीवर भेद दिसून येतात.उदा. घरकामगार ही संज्ञा खङ्ज ने निर्माण करण्यापूर्वी घरकाम करणाऱ्या व्यक्तींसाठी मोलकरीण , बाई , यासारख्या व्यक्तीचा न्यूनदर्जा दाखवणाऱ्या संकल्पना महाराष्ट्रातही वापरात होत्या व आहेत . तसेच घरकाम म्हणजे नेमके कुठले काम याचे संदर्भही प्रत्येक देशात वेगळे आहेत.( ILO 2010, Ramires



St. Mira's College for Girls, POONA-411001
Principal Incharge
St. Mira's College for Girls, Pune

Machado)

ILO À`m C189 मधे केलेया व्याख्येनुसार –

१) घरकाम म्हणजे कुटुंबामधे / कुटुंबासाठी केलेले काम

२) कुटुंब (कुटुंब प्रमुख ) म्हणजे मालक व घरकामगार त्यांच्यात मालक - कामगार असा संबंध असायला हवा

३) असे काम नियमित स्वरुपाचे असावे.

४) घर हे कामाचे ठिकाण असावे.

५) कुटुंबातील व्यक्तींनीच केलेले काम घरकाम म्हणून धरले जाणार नाही

२) घरकामक्षेत्राविषयी दुसरी अडचण म्हणजे या असंघटित घरकामगारांची संख्या मोजणे.राष्ट्रीय आकडेवारीमधे बरेचदा घरकामगारांची संख्या योग्यप्रमाणात मोजली जात नाही.(Vanek, Chan & Ravindran 2012, ILO 2013) भारतासाठी विविध संस्थांनी केलेल्या घरकामगारांच्या मोजमापात विलक्षण तफावत आढळते ( खडज्ज २०१३) भारतात घरकामगारांसाठीच्या कृती समिती (२०११)च्या मते घरकामगारांची गणना अपूर्ण असण्याची प्रमुख कारणे म्हणजे घरकाम हे खऱ्या अर्थाने काम समजले जात नाही त्यामुळे बरेचदा हे काम अदृश्य व अव्यक्त स्वरुपात राहते. दुसरे कारण म्हणजे अर्धवेळ घरकाम करणारे कामगार इतर हंगामी स्वरुपाचे कामही करीत असतात.२००४-०५ च्या राष्टीय नमुना सर्वेक्षणावर आधारित घरकामगारांची संख्या नीता एन. (२००९)यांच्यामते ४.७५ दशलक्ष तर जी. रवीद्रंन यांच्या मते ५.२ दशलक्ष आहे. (Vanek. etal 2012) नॅशनल प्लॅटफॉर्म फॉर डोमेस्टिक वर्कर्स (२०१३) यांच्या मते भारतातील घरकामगारांची विश्वासर्ह गणती ४० ते ५० दशलक्ष एवढी आहे.

३) घरकाम या क्षेत्रात प्रामुख्याने स्त्री कामगारांचे प्रमाण अधिक आढळते. खडज्ज (२०१३) च्या अहवालानुसार जगातील घरकामगारांपैकी ८३% घरकामगार स्त्रिया आहेत. हे प्रमाण मध्यपूर्व देशांमध्ये ६३% तर लॅटिन अमेरिकत ९२% पर्यंत आहे .नीता एन. (२०१३) यांच्या मते घरकामातील मोलकरीण , स्वयंपाकी व आया या उपगटातील कामगारांची संख्या २००९-१० मधे १.८३ दशलक्ष इतकी होती तसेच या गटातील स्त्री कामगारांची संख्या देखील ६८% इतकी जास्त होती.

४) घरकामविषयी विशिष्ट संकल्पना – घरकाम हे खाजगी घराच्या मर्यादेत घडत असल्यामुळे त्याविषयी अनेक मतप्रवाह आढळतात.बरेचदा यात एक बाजूस गुलामगिरीची मानसिकता (servitude) तर दुसऱ्या बाजूस घरकाम करणारी व्यक्ती कुटुंबातील एक घटक असण्याची मानसिकता अशा दोन टोकाच्या कल्पना दिसतात. तसेच घरकाम हे कामाचा व पर्यायाने घरकाम करणाऱ्या व्यक्तीचा न्यून दर्जा दर्शवते असाही मतप्रवाह प्रचलित आहे. हे सर्व घटक घरकाम करणाऱ्या व्यक्तिंना कामगार हा दर्जा मिळवून देण्यात अडथळा आहेत.त्याचवेळी या कामाचे विशिष्ट स्वरुप बघता या क्षेत्रातील कामगारांना कायद्याची अधिक गरज आहे असेही दिसून येते.

S. M. ... COLLEGE FOR GIRLS * POONA-411001

विभाग II : घरकामगार , कायदा व सामाजिक सुरक्षितता

या विभागात विविध देशातील राष्ट्रीय कायदयांमधे घरकामगारांसाठी असणाऱ्या वेतन , कामाचे तास , प्रसुतीलाभ इ. तरतुदींचा विचार केला आहे. खडज्ज (२०१३) च्या अहवालानुसार ५६.६ % घरकामगारांसाठी कामाच्या तासांची कायदेशीर मर्यादा लागू होत नाही.यापैकी २८.२ दशलक्ष घरकामगारांना त्यांच्या देशातील अशा तरतुदींचा इतर कामगारांप्रमाणे लाभ मिळत नाही.तसेच जगातील ४४% हुन अधिक घरकामगारांना साप्ताहिक अथवा वार्षिक सुटीचा लाभ मिळत नाही. सर्वसाधारणपणे घरकामगारांचे वेतन देशाच्या सरासरी वेतनाच्या तुलनेत निम्म्याहुन कमी असते.भारतात हे प्रमाण सरासरी वेतनाच्या ३१.६% आहे. ( ILO 2013:68) . जागतिक पातळीवर ४२.६ % घरकामगार किमानवेतनाच्या तरतुदीपासून वंचित आहेत. प्रसूतीकाळात रजा व इतर लाभ न मिळणाऱ्या घरकामगारांचे प्रमाण ३५ % हुन अधिक आहे. आशियाई व मध्यपूर्व देशांमधे असे कायदे असण्याचे प्रमाण सर्वात कमी आहे तसेच इतर कामगारांसाठीचे कायदे घरकाम क्षेत्राला लागू होत नसल्याने घरकामगार कायद्याच्या संरक्षणापासून वंचित राहतात

असे म्हणता येईल.

ILO ने २०११ च्या आपल्या १०० व्या अधिवेशानामधे घरकामगारांसाठी संकेत (C189) व शिफारशी ( R201) स्वीकारल्या. पहिल्यांदाच घरकामासारख्या असंघटीत व स्त्रियांचे प्राबल्य असणाऱ्या क्षेत्रासाठी संकेत (Covnention) स्वीकारुन खडञ्ज ने ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. C189मधे घरकाम व घरकामगारांची व्याख्या , त्यांचे नोंदणीकरण , वेतन व इतर कामाच्या अटी , स्थलांतरित घरकामगार व त्यांचे प्रश्न यासंबंधीच्या तरतूदी आहेत. २०१२ मधे उरुग्वे व फिली पाईन्स या दोन देशांनी स्वीकारल्यानंतर २०१३ मधे हा संकेत उ१८९ अस्तित्वात आली. त्यानंतर २२ देशांनी हा स्वीकारला आहे.( ILO २०१६)

भारतात १९५९,१९७२,१९७७ व १९८९ मधे घरकामगारांसाठी कायदयाची विधेयके मांडण्यात आली. परंतु त्यांना कायद्याचे स्वरुप प्राप्त झाले नाही. १९८६ मधे प्रसिध्द झालेल्या श्रमशक्ती अहवालात ही घरकामगारांसाठी वेतन व इतर कामाची शर्ती ठरवणे , तसेच सामाजिक सुरक्षितता प्रदान करणे अशा शिफारशी होत्या . राष्ट्रीय महिला आयोगातर्फे २००८ व २०१० मधे घरकामगारांसाठीच्या कायदयाचा मसुदा मांडला आहे.निर्मला निकेतन व असंघटीत कामगारांच्या राष्ट्रीय समितीने देखील २००८ मधे घरकामगार कायदयाचा मसुदा प्रस्तुत केला आहे.

२००९ मधे घरकामगारांसाठी राष्ट्रीय पातळीवर कृती समिती स्थापन करण्यात आली. तिचा अहवाल व शिफारशी २०१० मधे शासना ने स्वीकरला. कृती समितीच्या पहिला शिफारशींमधे घरकामगारांना आरोग्य व प्रसूती सुविधा, वृध्दत्वातील फायदे , मृत्यू / अपंगत्व आल्यास मिळणारे लाभ, घरकामगारांची नोदंणी , किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी, घरकामगारांची भरती करणाऱ्या संस्थांची नोदंणी व नियंत्रण घरकामगारांसाठी कौशल्य विकास योजना यांचा समावेश होता

भारतात केंद्र व राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांना कायदयान्वये १४ वर्षाखालील मुलांना घरकामगार म्हणून कामावर ठेवण्यास मनाई आहे.२००८ चा असंघटित कामगारांसाठीचा सामाजिक सुरक्षा आणि २०१३ चा लैंगिक छळ (विरोधी) कायदा यात घरकामगारांचा समावेश केलेला आहे.भारतात पंजाब , केरळ , कर्नाटक , आंध्रप्रदेश , हरियाणा या राज्यांत व दादरा – नगरहवेली या केंद्रशासित प्रदेशात घरकामगारांचा समावेश किमान वेतन तरतुदींमधे केलेला आहे. केरळ आणि हरियाणा या राज्यात कामगारांच्या सामाजिक सुरक्षा योजना घरकामगारांना लागू करण्यात आलेल्या आहे.

विभाग III : घरकामगारांचे संघटन –

असंघटितांचे संघटन ही साधारण दोन दशकांपूर्वी सुरु झालेली चळवळ आता खूपच विस्तारली आहे. घरकाम सारख्या असंघटित व असुरक्षित रोजगार क्षेत्रासाठी अशा संघटना फारच महत्त्वाच्या ठरतात. आंतरराष्ट्रीय पातळीवर WIEGO(Women in informal Employment : Globalising and Organising) व IDWF(International Domestic workers Federation) सारख्या संघटनांनी त्यांच्याशी संलग्न असणाऱ्या संस्थांमार्फत असंघटित स्त्री घरकामगारांना संघटित करणे व घरकामक्षेत्रातील रोजगाराला प्रतिष्ठा व सुरक्षा मिळवून देणे यासाठी धोरणात्मक पातळीवर प्रयत्न केलेले आहेत.

१) भारतात सेवा , अस्तित्व , स्त्री जागृती समिती, निर्मला निकेतन , परिचिती यासारख्या संस्था व कामगार संघटना स्त्री घरकामगारांसाठी कार्यरत आहेत.सेवाभावी संस्था , सहकारी संस्था तसेच कामगार संघटना अशा विविध स्वरुपात या संस्था घरकामगारांच्या कल्याणासाठी व त्याच्या कामगार – हक्कांसाठी लढा देताना दिसतात.(डरलीीत्रळश्रश २०१०)

महाराष्ट्रातील विदर्भ मोलकारीण संघटना तसेच पुणे शहर मोलकरीण संघटना या स्त्री घरकामगारांनी स्वतःच्या प्रयत्नातून स्थापन केलेल्या घरकामगार संघटना आहेत. वेतनवाढ , दिवाळीचा बोनस, आठवडयाची सुटी इ. मागण्यांसाठी संप व निदर्शने करुन घरकामगारांनी आपले संघटनेचे बळ दाखवून दिले . पुण्यातील मोलकरीण

St. MIRA'S COLLEGE FOR GIRLS POONA-411001

ISSN : 2348-7143
January-2019

संघटना आपल्या सदस्यांसाठी कामाचे दरपत्रकही जाहिर करते.घरकामगारांना व त्यांच्या कामाला प्रतिष्ठा मिळवून देणे , घरकामगारांचा आत्मसम्मान वाढवणे व त्यासाठी सदस्यांना ओळखपत्र देणे, नोंदणी करणे व सरकारी योजनांचे लाभ मिळवून देणे , घरकामगारांचे शोषण , त्यांच्यावरील अन्याय याविरोधात आवाज उठवणे , मालकवर्ग , पोलीस या व्यवस्थांशी संवाद निर्माण करणे अशी या संघटनांची कार्यपद्धती आहे. संप व निदर्शने या कामगार संघटनांच्या साधनांचा प्रभावी वापर हे या असंघटितांच्या संघटनांचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

भारतात मध्यवर्ती कामगार संघटनांनीही असंघटित कामगारांची दखल घेतलेली दिसून येते. भारतीय मजदूर संघ (इचड) ची घरेलु कामगार संघ ही घरकामगारांची युनियन पुण्यात व इतर शहरांत कार्यरत आहे. सेंटर ऑफ इंडियन टेड युनियन्स (उखढण) ने ऑल इंडिया डेमोक्रॅटिक वुमेन्स असोसिएशन (अखउथअ) च्या साथीने घरकामगारांना संघटित केले आहे. इंडियन नॅशनल टेड युनियन काँग्रेस ने बंगलोर इथे कर्नाटक डोमेस्टिक वर्कर्स युनियन काँग्रेस(खछढणउ) ची स्थापना २००९ मधे केली.(एश्रीळ । ड्ळसिह २०१३) ऑल इंडिया टेड युनियन काँग्रेसनेही घरकामगारांची नोंदणी करुन त्यांची संघटना स्थापन केली आहे. अखढणउ च्या मते मालकवर्गानेही घरकामगारांच्या संघटना – निर्मितीला चालना दिली पाहिजे व घरकामगारांच्या न्याय्य मागण्यांसाठी सरकारने कृतीशील राहिले पाहिजे.

विभाग IV :

महाराष्ट्त मुंबई , ठाणे , पुणे व नागपूर जिल्हयांसाठी २००० मधे राज्य सरकारने एक आचारसंहिता व अध्यादेश जाहिर केला होता. यात घरकामगारांसाठी कामाच्या अटी तसेच सामाजिक सुरक्षितता निश्चित करण्याची तरतूद होती.यासाठीचा एक प्रस्ताव २००३ मधे मांडण्यात आला होता. परंतु प्रत्यक्षात त्यावर कार्यवाही झाली नाही.

२००८ महाराष्ट राज्य घरकामगार कल्याण मंडळ कायदा म्हणजे घरकामगारांच्या सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने टाकलेले महत्वाचे पाऊल आहे. महाराष्ट-सरकारने २०११ मधे घरकामगार कल्याण मंडळाची स्थापना केली व त्यासाठी सुरवातीला ६.५ कोटी रु.तरतूद करण्यात आली.मंडळाकडे घरकामगारांची नोदंणी करणे, अपघात, मृत्यू यासाठी तरतूद, प्रसूतीलाभ यासारख्या कामांची जबाबदारी आहे. सध्या खालील योजना घरकामगार कल्याण मंडळाकडे कार्यन्वित आहेत.

१) जनश्री विमा योजना- यात जीवनविमा व अपघात विमा यावरोबरच घरकामगारांचा ९ ते १२ वी शिकणाऱ्या मुलांसाठी शैक्षणिक साहयाची तरतूद आहे.
२) सन्मान धन – ५५ वर्षांवरील घर कामगारांसाठी रु १०,००० चे विशेष सन्मान – धन योजना राबविण्यात आली.
३) प्रसूतीलाभ- दोन मुलांसाठी प्रत्येकी रु.५००० प्रमाणे प्रसूती अर्थसाहयाची तरतूद आहे.
४) मृत्यूनंतरच्या विधींसाठी अर्थसाहय रु २०००
५) घरकामगारांच्या मुलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षणाची तरतूद
६) घरकामगारांच्या मुलांसाठी शैक्षणिक साहित्य (लॅपटॉप) यापैकी व्यावसायिक प्रशिक्षण व शैक्षणिक साहित्य या योजना कार्यान्वित होणे बाकी आहे.

St. MIRA'S COLLEGE FOR GIRLS * POONA-411001 *

घरकामगार कल्याण मंडळाच्या कार्यासंदर्भात खालील बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे-

१) घरकामगारांची नोदंणी कागदपत्रांची छाननी इ.साठी आवश्यक असणारा कर्मचारी वर्ग नसल्यामुळे नोदंणी , ओळखपत्रे इ.कामे रखडली आहेत.
२) अपुरा निधी- महाराष्टातील घरकामगारांची संख्या पाहता सुरुवातीला केलेली निधीची तरतूद अपुरी आहे.
३) नोदंणी प्रक्रिया ऐच्छिक असल्याने सर्व घरकामगारांचा यात समावेश झालेला नाही.
४) मंडळाच्या योजना पाहता घरकामगारांचा सामाजिक सुरक्षेवर मर्यादित प्रमाणात लक्ष दिलेले दिसते उदा. प्रसूती लाभ , विमा इ. मात्र निवृत्तीवेतनासारख्या घरकामगारांना आवश्यक असणाऱ्या योजनांचा अभाव दिसून येतो. मोघे(२०१३) यांच्या मते जनश्री योजना ही घरकामगारांच्या दृष्टीने महत्त्वाची सामाजिक कल्याण योजना आहे मात्र त्या अंतर्गत घरकामगारांना लाभ मिळण्याचे प्रमाण अतिशय कमी आहे. तसेच प्रसूतीलाभ व मृत्यूनंतर मिळणारे फायदे यांचे प्रमाण अत्यंत तोकडे आहे.

५) मंडळाकडून कामाच्या शर्ती जसे की वेतन , सुटया ,बोनस इ. निश्चित करण्याचा कोणताही प्रयत्न झालेला नाही.मुळात केवळ कल्याणकारी योजनांचाच समावेश मंडळाच्या कार्यक्षेत्रात केल्यामुळे कामाच्या शर्ती ठरवण्याचे महत्त्वाचे कार्य मंडळाच्या कक्षेबाहेर राहिले आहे.

६) घरकामगारांची नोंदणी करण्याच्या प्रक्रियेत राजकिय हस्तक्षेपाच्या घटना घडल्या होत्या. घरकामगारांची नोंदणी करुन त्यातून राजकिय फायदा मिळवण्याच्या प्रयत्नात बऱ्याच राजकिय पक्षांनी घरकामगारांची नोदंणी करुन त्याची पावती घरकामगारांकडे न दिल्याने बऱ्याच जणांना मंडळाच्या ओळखपत्रापासून व इतर लाभांपासून वंचित रहावे लागले.

विभाग V निष्कर्ष :

घरकाम क्षेत्राचे व त्यातील घरकामगारांचे कायदयाद्वारे नियमन व सरंक्षण करणे हा कळीचा गुद्दा आहे. घरकामाचे असंघटित स्वरुप त्यातील त्रियांचे बहुल प्रमाण , वेतन व बोनस यासारखे अनिर्णित प्रश्न , निवृत्तीवेतनाची गरज यासारख्या विशेष प्रश्नांमुळे तसेच घरकामांच्या वाढत्या मागणीमुळे या क्षेत्राचे कायदयाने नियमन होणे अत्यावश्यक आहे. मात्र धरकामातील वैविध्य आणि खाजगी घर हे कार्यक्षेत्र असल्यामुळे येणाऱ्या अडचणी लक्षात घेतल्यास घरकामक्षेत्रासाठी कायदा करणे तितकेसे सोपे नाही. घरकामाचे तास ठरवणे , वेतनपद्धती व कामानुसार / वेळेनुसार वेतननिश्चिती करणे यासाठी घरकामगार व मालक या दोन्ही वर्गांचे योगदान व सहकार्य अपेक्षित आहे.घरकामगारांच्या संघटनांमुळे या प्रश्नांची काही अंशी तड लागणे शक्य झाले आहे परंतु या सर्व प्रक्रियेत मालकवर्गची कोणतीही भूमिका दिसून आलेली नाही. ज्या राज्यांमध्ये किमान वेतन निश्चित केले आहे तिथेदेखील त्याची अंमलबजावणी करणे अवघड आहे. या सर्व पार्श्वभूमीवर घरकामगारांच्या संघटना महत्वाची भूमिका पार पाडताना दिसतात. घरकामगारांसाठी वेतन – पातळी टिकवून ठेवणे , त्यांच्या कामाच्या अवघड परिस्थितीबद्दल जनजागृती करणे, शासन मालकवर्ग व समाज यांच्यासाठी घरकामगारांचा आवाज बनणे हे घरकामगारांच्या संघटनांचे प्रमुख यश म्हणता येईल.

---

**References:**


- बांधकाम मजदूर सभा (२००६) कष्टकऱ्याची सावली.
- ILO (2010) "Decent work for Domestic Workers" Report IV (1), International Labour Organization, Geneva
- ILO (2011) "Convention 189 & Recommendation 201 on Decent Work for Domestic Workers" International Labour Organization, Geneva
- ILO (2011a) "Decent Work for Domestic Workers Convention 189 & Recommendation 201 at a glance" International Labour Organization, Geneva
- ILO (2013) "Domestic workers across the world: Global and regional statistics and the extent of legal protection" International Labour Organization, Geneva.
- ILO (2016) "Decent work for domestic workers: Achievements since the adoption of Convention C189" Briefing Note, International Labour Organization, Geneva.
- Labour Bureau (2015) "Report On The Working Of The Minimum Wages Act 1948 For The Year 2013" Ministry of Labour and Employment, Government of India
- Ramirez-Machado, Jose Maria (2003) "Domestic work, conditions of work and employment: A legal perspective" ILO. Geneva.
- Moghe Kiran (2013) "Organising Domestic Workers in Pune City" Economic and Political Weekly, Vol. XLVIII No. 43, pp 63-68
- National platform of Domestic Workers (2013) "Petition to Parliament" available at www.nirmana.org/domestic_worker/DW_Petition_to_Parliament_2013_English.pdf accessed on 22/8/2013
- Neetha N.(2009) "Contours Of Domestic Service: Characteristics, Work Relations And


ST. MIRA'S ... FOR GIRLS POONA-411001